# उल्हासनगर महानगरपालिका
## मालमत्ता कर विभाग
मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र
Tel No: 95251-2720116/125 Ext No 238 Fax No: 95251 2720104


जा. क्र. उमपा/कर विभाग/५८/२४
दिनांक : ०९ जुलै, २०२४

संदर्भ- मा.सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांचेकडील पत्र क्र म.जा.क्र. २२३७/ २०२४, दिनांक १८/०६/२०२४

## आदेश

मा. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली (मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली) यांचे निर्देशानुसार दरवर्षी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन केले जाते. व सन २०२४ मधील पहिले राष्ट्रीय लोकअदालत शनिवार दिनांक: २७ जुलै २०२४ रोजी संपुर्ण भारतभर आयोजित केलेले आहे.

२) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजित १.८० लाख मालमत्ता असुन वित्तीय वर्ष २०२४-२०२५ करीता एकुण मागणी रु. ९५१.१० कोटी इतकी असुन माहे जून २०२४ पर्यंत रक्कम रु. १२.९० कोटी इतकी वसुली झाली आहे.

३) उक्त कराच्या मागणीत पुढील बाबी समाविष्ट असल्यामुळे करदत्यांचा कर भरणा न करण्याकडे कल आहे.

अ) मालमत्ता कर आकारणीत वाद आहे.

ब) कर आकारणीबाबत न्यायालयात दावे दाखल असुन त्यामध्ये अद्यापही निर्णय प्रलंबित आहेत.

क) आर्थिक अडचणी.

ड) कराच्या मागणीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ अंतर्गत बिलाच्या न दिलेल्या रक्कमेवर प्रतिमाह २ टक्के दराने आकारण्यात येणारे विलंब शास्ती रक्कम रु. ५१८.९८ कोटीचा समावेश आहे. विलंब शास्तीमुळे कराचे मागणीत सतत वाढ होत आहे.

४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१ नुसार, मालमत्ता करावरील, नियम ४१ अंतर्गत लागु असलेली विलंब शास्ती माफ करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत.

५) <u>दिनांक : २७ जुलै, २०२४ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदाल तसेच</u> मालमत्ता कर वसुलीच्या दृष्टीने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" मधील प्रकरण ८ (कराधान नियम) चे नियम ५१ नुसार आयुक्तास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मालमत्ता करावरील, अधिनियमाचे नियम ४१ अंतर्गत लागु असलेली विलंब शास्ती माफ करणेकरिता प्रस्तावित **"अभय योजना २०२४-२०२५"** चा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**अ) कालावधी :-** सदर योजना दिनांक : २२ जुलै, २०२४ ते दिनांक :२७ जुलै २०२४ या कालावधीसाठी लागु करणे.

**ब) व्याप्ती :-** योजनेच्या कालावधीत करदात्याकडे थकीत असलेली मालमत्ता कराची मुळ रक्कम खालीलप्रमाणे महानगरपालिकेत भरणा केल्यास थकीत रक्कमेवर, नियम ४१ नुसार प्रतिमाह २ टक्के दराने आकारण्यात आलेली विलंब शास्ती नियम ५१ अंतर्गत माफ करणे.

| कालावधी | मागणीचा तपशिल | विलंब शास्ती माफीचा तपशिल |
|---|---|---|
| दिनांक : २२ जुलै, २०२४ ते दिनांक : २७ जुलै २०२४ | थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम एकरकमी भरणा केल्यास | १०० टक्के विलंब शास्ती माफ (थकबाकी रक्कमेवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) |

**ब-१) योजनेअंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा:-** सदर योजना ही वर नमुद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रक्कमांनाच लागु राहील. या योजनेच्या प्रारंभापुर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांना लागू राहणार नाही. योजना सुरु होण्यापुर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत दावा करता येणार नाही.

**ब-२)** दिनांक : २२ जुलै, २०२४ ते दिनांक :२७ जुलै २०२४ या कालावधीत योजनेची सवलत देणेकामी उक्त नमुद केलेप्रमाणे संगणकप्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

CamScanner

क) योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी करदात्यावर खालीलप्रमाणे अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

क-१) योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणतेही प्रलंबित असलेले अपील, पुर्नविलोकनासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहीजे.

क-२) योजनेचा लाभ घेतल्यानंतर, कराची रक्कम भरणा केल्यानंतर, कोणतेही अपील, पुर्नविलोकनासाठी आवेदने, संदर्भ आवेदने, विविध स्तरावरील न्यायालयात दावा दाखल करणे किंवा रिट याचिका दाखल करता येणार नाही. व तसे केल्यास योजने अंतर्गत दिलेली सवलत काढून घेण्यात येईल.

ख) **आयुक्तांचे अधिकार प्रदान करणे:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२८, कलम ६१ व अधिनियमाचे अनुसूची "ड" मधील प्रकरण ८ (कराधान नियम) चे नियम ५१ नुसार, आयुक्तास असलेले अधिकार, दिनांक : २२ जुलै, २०२४ ते दिनांक : २७ जुलै २०२४ या कालावधीत कर निर्धारक व संकलक यांना प्रदान करणे. सदर कालावधीनंतर हे अधिकार संपुष्टात येतील.

**इ) जनजागृती, प्रसिध्दी व जाहीरात :-**

इ-१) जास्तीत जास्त प्रमाणात नागरिकांना योजनेचा लाभ घेता यावा तसेच योजनेस मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळावा यासाठी, योजनेचा तपशिल केबल, वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक्स प्रसार माध्यमे, महानगरपालिका संकेतस्थळ इ. द्वारे व्यापक प्रसिध्दी जनसंपर्क विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, मालमत्ता कर विभागामार्फत करणे.

इ-२) सदर योजना सुरु होणेपुर्वी तसेच योजनेच्या कालावधीत संबंधित नियुक्त वसुली कर्मचारी हे प्रत्येक थकबाकीदाराच्या भेटी घेऊन सदर योजनेचे प्रबोधन करतील व त्यांना थकबाकी भरणेकामी प्रोत्साहीत करणे

इ-३) कर विभागाने थकबाकीदार मालमत्ताधारक/ भोगवटादार यांना अभय योजनेबाबत जास्तीत जास्त जनजागृती करावी.

उ) दिनांक : २७ जुलै २०२४ नंतर मालमत्ता कर न भरणाऱ्या कसुरदारांविरुध अधिनियमातील तरतुदीनुसार सक्तीची (मालमत्ता जप्ती/अटकावणी करणे, लिलाव करणे वगैरे) कार्यवाही सुरु करणे.

सदर आदेशाची सर्व संबंधितांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

(डॉ.अजीज शेख) भा.प्र.से.
प्रशासक तथा आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,
१) कर निर्धारक व संकलक
२) संबंधित उप कर निर्धारक व संकलक/संबंधित कर निरीक्षक
३)मे कोल्ब्रो ग्रुप

CamScanner